राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत माथेरान येथील शार्लोट तलावास पर्यावरणीयदृष्टया संवर्धन व संरक्षण करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पातील कामांसाठी निधी मुक्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्रमांकः रासयो-२०१९/प्र.क्र.१३७/तां.क.२

नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १४ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा -</u>

१) पर्यावरण विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय,दिनांक: ७ मार्च, २००७.
२) सुकाणू समितीची दिनांक ५ फेब्रूवारी २०१५ रोजीची बैठक.
३) माथेरा गिरीस्थान नगर परिषद यांचे क्रमांक मागिनच/१०६५/२०१८-१९ दिनांक ७.८.२०१८.

<u>प्रस्तावना -</u>

राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत माथेरान येथील शार्लोट तलावाचे संवर्धन करण्याच्या प्रस्तावास सन २००७ या वर्षात पर्यावरणीदृष्टया संवर्धन करण्यासाठी नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेने दिनांक ७ मार्च २००७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.३,६२,६५,०००/- (अक्षरी रुपये तीन कोटी बासष्ट लक्ष पासष्ट हजार फक्त) एवढया खर्चाच्या रक्कमेस मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी अनुज्ञेय राज्य हिश्श्याच्या ९० टक्के म्हणजे रु. ३,२६,३०,०००/- लक्ष (रुपये तीन कोटी सव्वीस लक्ष तीस हजार फक्त) एवढया निधीपैकी दिनांक ७ मार्च २००७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये १,००,००,०००/-(रु.एक कोटी फक्त) वितरित करण्यात आले होते. सदर रक्कमेचा पूर्णपणे विनियोग झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेने सादर केले आहे. उपरोक्त कागदपत्राच्या आधारे तसेच एकूण खर्चाच्या अनुषंगाने माथेरान येथील शार्लोट तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी झालेल्या खर्चास उर्वरित निधी मुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

१. राज्य योजनेखाली राज्य सरोवर योजनेंतर्गत माथेरान गिरीस्थान नगरपरिषद अंतर्गत शार्लोट तलावाचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी संदर्भाधीन दिनांक ७ मार्च, २००७ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे एकूण रुपये ३,६२,६५,०००/- (रुपये तीन कोटी बासष्ट लक्ष पासष्ट हजार फक्त) इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर रक्कमेपैकी राज्य हिश्श्यापोटी देय असलेल्या रुपये ३,२६,३०,०००/- (रु. तीन कोटी सव्वीस लक्ष तीस हजार फक्त) पैकी प्रथम हप्त्यापोटी रुपये १,००,००,०००/- (रु. एक कोटी फक्त) इतका निधी वितरित करण्यात आला असून या शासन निर्णयान्वये शार्लोट तलावाच्या संवर्धनासाठी उर्वरित कामे राबविण्यासाठी पुढील हप्ता रुपये १,००,००,०००/- (रुपये एक कोटी फक्त) इतक्या रक्कमेस मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत माथेरान गिरीस्थान नगरपरिषद अंतर्गत शार्लोट तलावाचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी राज्य हिश्श्यापोटी देय एकूण रुपये ३,२६,३०,०००/- (रु. तीन कोटी सव्वीस लक्ष तीस हजार फक्त) एवढया रक्कमेपैकी या शासन निर्णयाव्दारे दुसरा हप्ता रुपये १,००,००,०००/- (रुपये एक कोटी फक्त) इतकी रक्कम खर्च करण्यास मुख्याधिकारी, माथेरान नगरपरिषद यांना या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

३. यासाठी मुख्याधिकारी, माथेरान नगरपरिषद, (Chief officer, Matheran Municipal Council, Raigad) यांचे नांवे रुपये १,००,००,०००/- (रुपये एक कोटी फक्त) एवढया रकमेचा धनादेश काढण्यात यावा.

४. मुख्याधिकारी माथेरान नगरपरिषदेला अदा करावयाची रुपये १,००,००,०००/- (रु. एक कोटी फक्त) एवढी रक्कम अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून मुख्याधिकारी, माथेरान नगरपरिषद, माथेरान गिरीस्थान नगरपरिषद यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्रीम. शिल्पा चं. शिर्के , कार्यासन अधिकारी, पर्यावरण विभाग व नियंत्रक अधिकारी म्हणून श्री. सु. कि. निकम, उप सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी मुख्याधिकारी, माथेरान गिरीस्थान नगरपरिषद यांना रुपये १,००,००,०००/- (रुपये एक कोटी फक्त) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाव्दारे वितरित करण्याची कार्यवाही करावी.

५. सदर प्रयोजनार्थ होणार खर्च हा मागणी क्र. यु-४, ३४३५- परिस्थितीकी व पर्यावरण ०४, प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण, १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना, (०२) पर्यावरण प्रतिबंध , (०२) (०७), राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना (३४३५ ०१८२), ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर)" या मुख्य-लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या वर्षात अर्थसंकल्पित रु. १५,००,००,०००/-(रु.पंधरा कोटी फक्त) मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली वर्गीकृत करण्यात यावा.

६. उपरोक्त प्रस्तावांतर्गत एकूण खर्चाच्या रक्कमेस नियोजन व वित्त विभागाने यापूर्वी मान्यता दिलेली आहे. तसेच वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं २०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३ दिनांक २०.४.२०१६ मधील परिच्छेद क्र.७ (क) अन्वये सदर प्रस्तावास निधी वितरणासाठी वित्त विभागाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७ मधील परिच्छेद क्रमांक ७ ते १८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. तसेच प्रमाणित करण्यात येते की दिनांक १८.४.२०१७ राजीच्या शासन निर्णयातील परिशिष्टातील अनु. क्र. ३ व ८ मधील अटींची पूर्तता होत आहे. या शिवाय वित्त विभागाच्या शासन परिपत्राक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१ /कोषा.प्रशा.५ दिनांक १०.५.२०१६ अन्वये खालील बाबीची पुर्तता होत आहे.

८. तसेच सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं २०१७/प्र.क्र.९४/अर्थ.३ दिनांक ३०.६.२०१७ अन्वये परिच्छेद क्र. ४ मधील खालील बाबींची पूर्तता होत आहे.

१.शासन निर्णयातील परिच्छेद ७ मधील मुद्या क्रमांक १ व मुद्या क्रमांक ९ बाबत वित्त विभागाच्या शासन परिपत्रक दिनांक १८ एप्रिल २०१७ मधील परिच्छेद क्र.७ (अ) नुसार रु.५ कोटीच्या पर्यंतच्या अनावर्ती योजनेच्या खर्चात प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना आहेत.

२. माथेरान येथील खंडाळा तलावाच्या प्रस्तावासाठी रु. ३,६२,६५,०००/- (रु. तीन कोटी बासष्ट लक्ष पासष्ट हजार फक्त) एवढया निधीमधील राज्य हिस्सा रुपये ३,२६,३०,०००/- (रु. तीन कोटी सव्वीस लक्ष तीस हजार फक्त) उर्वरित कामासाठी पुढील हप्त्यापोटी म्हणून रुपये १,००,००,०००/- (रु एक कोटी फक्त) इतका निधी प्रस्तुत शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात येत आहे.

३. सदर तलावास मागील तीन महिन्यात कोणताही निधी मुक्त करण्यात आलेला नाही. तसेच मुख्याधिकारी, माथेरान गिरीस्थान नगरपरिषद यांना वितरित करण्यात आलेलया अनुदानाचा १०० टक्के विनियोग पूर्ण केला असल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे.

४. मागणी क्रमांक यु-४, ३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण , ०४, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण, १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनेतंर्गत योजना, (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२) (०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना (३४३५ ०१८२) , ३५ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या मुख्य लेखाशिर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५. माथेरान नगरपरिषदेचे पर्यावरण विभागाकडे कोणतेही येणे बाकी नाही.

६. तसेच उपरोक्त शासन निर्णयाच्या "अ" मधील परिच्छेदातील ६,७,८,९ या बाबी लागू नाहीत.

९. उपरोक्त शासन निर्णयामध्ये वित्त विभागाचे परिपत्रक क्र अर्थंस २०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३ दिनांक २.४.२०१८ अन्वये ३१ वेतनेतर सहायक अनुदाने या बाबी खालील खर्च करण्यात विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील नमूद अटींची पूर्तता करण्यात आली आहे.

१०. वित्त विभागाचे परिपत्रक क्र अर्थंस २०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३ दिनांक ०८.०७.२०१९ सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अनुक्रमांक १,२,३,४,५,६,७ व ८ या प्रकरणी लागू नाही. तसेच सदर परिशिष्टातील अनुक्रमांक ४ बाबत नमूद करण्यात येते की नियोजन व वित्त विभागाची सहमती घेण्यात आली आहे.

११. वित विभागाचे परिपत्रक क्र.अर्थंस २०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३ दिनांक ०८.०७.२०१९ च्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.९ तपासणी सूचीमधील अ.क्र. १,२,४ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अटींची पूर्तता होत आहे. तसेच सपासणी सूचीमधील अ.क्र. ३ व ५ ते १० या प्रकारणी लागू नाही.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८१४११५३३१३१०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shuddhodhan D Aher

Digitally signed by Shuddhodhan D Aher
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Environment Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=19193e305825f30c0c7381430cc0f9fc9d9e4c47c2406ef9eca6ab6b77af1844, serialNumber=d9ed3af978d744c807b97e5551edcd2ab6f11c5495f5d6ef4863887d2775315c, cn=Shuddhodhan D Aher
Date: 2019.08.14 12:03:29 +05'30'

(शु. द. आहेर)
उप सचिव, पर्यावरण विभाग
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र १/२,मंबई/ नागपूर.
४. मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद.
५. जिल्हाधिकारी, जिल्हा कार्यालय, पुणे
६. अधिदान व लेखा अधिकारी, मंबई.
७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
८. मा.मंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
९. मा.राज्यमंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मंबई.
११. प्रधानसचिव, नगरविकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मंबई.
१२. वित्त विभाग (कार्यासन क्रमांक व्यय-१६/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई.
१३. नियोजन विभाग, कार्यासन क्र.१४७२, मंत्रालय, मंबई.
१४. रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवडनस्ती.